जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in

## -:प्रेस नोट :-

दिनांक :- १५/०५/२०२६

# " धरणगाव पोलिसांची मोठी कारवाई : गावठी पिस्टलसह आरोपी जेरबंद "

===ooo===

जिल्ह्यात अवैधरित्या घातक शस्त्रे व अग्नीशस्त्रे बाळगणाऱ्या इसमांबाबत गोपनीय माहिती काढून त्यांच्या विरोधात वेळोवेळी कारवाई करण्याबाबत मा. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगाव यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकाऱ्यांना मार्गदर्शनपर सूचना दिलेल्या आहेत.

त्यानुषंगाने श्री. सुनिल पवार, प्रभारी अधिकारी, धरणगाव पोलीस स्टेशन यांनी आपल्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी व अंमलदार यांना गोपनीय माहिती मिळवून जास्तीत जास्त अवैधरित्या घातक शस्त्रे व अग्नीशस्त्रे बाळगणाऱ्या इसमांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याबाबत आदेशित केले होते.

दि. १४/०५/२०२६ रोजी सुमारे १४:३० वाजता पाळधी पोलीस दूरक्षेत्राचे सहायक पोलीस निरीक्षक भूषण कोते हे आपल्या पथकासह **दोनगाव ता. धरणगाव शिवारातील गिरणा नदीपात्रात अवैध रेती वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी पेट्रोलिंग करीत असताना**, गिरणा नदीपात्रात एक इसम संशयितरित्या फिरताना आढळून आला. सदर इसमाकडे विचारपूस केली असता त्याच्याकडून समाधानकारक उत्तर मिळाले नाही तसेच त्याच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने सदर पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या कब्जातून २५,०००/- रुपये किमतीची गावठी बनावटीची मॅगझीनसह एक पिस्टल मिळून आली.

**त्यानुषंगाने आरोपी नामे आनंदा बळीराम सपकाळे, वय ३९ वर्षे, रा. आव्हाणे ता. जळगाव याच्या कब्जातील गावठी बनावटीची मॅगझीनसह पिस्टल जप्त करून त्याच्याविरुद्ध धरणगाव पोलीस स्टेशन येथे गु. रजि. क्र. १८७/२०२६ भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय बडगुजर, धरणगाव पोलीस स्टेशन हे करीत आहेत.**

**सदरची कारवाई मा. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगाव, मा. श्रीमती कविता नेरकर, अपर पोलीस अधीक्षक तसेच मा. श्री आण्णासाहेब घोलप, उपविभागीय पोलीस अधिकारी, चोपडा विभाग, चोपडा यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुनिल पवार यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक भूषण कोते, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय बडगुजर, पो. कॉ. ७९ ज्ञानेश्वर बाविस्कर, पो. कॉ. ३३८८ रविंद्र चौधरी, पो. कॉ. ८१६ विशाल पाटील, सर्व नेमणूक धरणगाव पोलीस स्टेशन यांच्या पथकाने उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केली आहे.**

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव**

**प्रति,**
**सर्व संपादक/वार्ताहार**
**प्रिंट मिडीया/इलेक्ट्रॉनिक मिडीया**
**2/- जनहितार्थ प्रसारण करीता**

*******************************************************************************************


महाराष्ट्र पोलीस


धरणगाव पोलीस स्टेशन
गु. र. नं. १८७/२०२६
आर्म्स ॲक्ट क ३/२५